महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर,विद्यानगर,कोल्हापूर ४१६००४

दुरध्वनी क्रं.०२३१-२५३५४०० **E-mail-jdkop@gmail.com**

जा.क्र.विससं/उशि/कोवि/ ई-ऑफीस/२०२६/E- 3156779 दिनांक-स्वाक्षरीप्रमाणे.

प्रति
प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित,
कला,वाणिज्य,विज्ञान,विधी,शिक्षणशास्त्र व
समाजकार्य महाविद्यालये,कोल्हापूर विभाग

विषय: **अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार करण्याकरिता ई-ऑफिस** (e-Office) **प्रणालीच्या वापराबाबत.**

संदर्भ: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक: HTED-३१०१०/६/२०२५-MHT-(HE-६)/E- १०२५८४५, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२६.

महोदय ,

शासकीय कामकाज गतिमान करणे, दस्तऐवज व माहिती सुरक्षित ठेवणे आणि निर्णयप्रक्रिया अधिक जलद, सुलभ व परिणामकारक करणे या उद्देशाने शासनाकडून **ई-ऑफिस** (e-Office) प्रणालीचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. विभागांतर्गत अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावांसंदर्भातील टपाल भौतिक स्वरूपात प्राप्त होत असल्यामुळे होणारा कालापव्यय आणि मनुष्यबळावर येणारा अतिरिक्त ताण टाळण्यासाठी या पार्श्वभूमीवर, मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.०४.२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली.

उपरोक्त बैठकीत उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना ई-ऑफीस प्रणाली उपलब्ध करून देण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते त्यानुसार राज्यातील सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना ई-ऑफिस प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली असून प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना लॉग-इन आयडी व प्रशिक्षण सुविधेसह ही प्रणाली नियमित वापरासाठी सज्ज करण्यात आली आहे.

या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संदर्भिय शासनाचे पत्र दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२६ नुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्देश पारित केले आहेत.

1. **अनिवार्य वापर**: सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांनी या कार्यालयाशी होणाऱ्या सर्व प्रकारच्या पत्रव्यवहारासाठी ई-ऑफिस प्रणालीचा नियमित व अनिवार्य वापर करावा.
2. **भौतिक स्वरूपातील कागदपत्रे**: केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्येच मूळ दस्तावेज किंवा प्रमाणित प्रत भौतिक स्वरूपात स्वीकारण्यात येईल. तथापि, अशा कागदपत्रांची स्कॅन प्रत देखील ई-ऑफिस प्रणालीद्वारे सादर करणे बंधनकारक राहील.
3. **प्रशासन जबाबदारी**: संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे महाविद्यालयाच्या ई-ऑफिस प्रणालीचे प्रशासक (Administrator) असतील. प्रणालीच्या लॉग-इन आयडी व पासवर्डची गोपनीयता राखणे आणि नियमित वापर सुनिश्चित करण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील.

तरी आपल्या महाविद्यालयाकडील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना याविषयी अवगत करून शासन निर्णयानुसार सर्व पत्रव्यवहार विहित वेळेत ई-ऑफिस प्रणालीद्वारेच करण्यात यावा.

Digitally signed by
PRAKASH DHONDU BACHHAV
Date: 08-10-2026 12:04:31

(डॉ. प्रकाश बच्छाव)
विभागीय सहसंचालक,(उ.शि.) ,
कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मुंबई-३२.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार करण्याकरिता ई-ऑफिस (e-Office) प्रणालीच्या वापराबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : HTED-३१०१०/६/२०२५-MHT-(HE-६)/E- १०२५८४५

मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०२६.

वाचा :

१) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०२/१८ (र. व का.), दिनांक ०२.०२.२०२३.

२) शासन परिपत्रक माहिती तंत्रज्ञान संचालनालय, क्रमांक मातंसं-२०२२/प्र.क्र.६२/से-१/३९, दिनांक २३.०२.२०२३.

३) शासन परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११६/मशि-१, दिनांक १८.०७.२०२३.

<u>प्रस्तावना :</u>

शासकीय कामकाज गतिमान करणे, दस्तऐवज व माहिती सुरक्षित ठेवणे आणि निर्णयप्रक्रिया अधिक जलद, सुलभ व परिणामकारक करणे, या उद्देशाने दिनांक ०१.०४.२०२३ पासून शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस (e-Office) प्रणालीचा प्रभावी वापर करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक १ ते ३ येथील शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालय, त्यांच्या अधिनस्त सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये तसेच शासकीय महाविद्यालये व संस्था यांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा वापर सुरू आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील १० विभागीय सहसंचालक कार्यालयांमार्फत राज्यातील एकूण १२३१ अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांशी संबंधित कामकाज करण्यात येते. या महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती, अनुकंपा नियुक्ती,

सेवाखंड, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती, सेवानिवृत्तिविषयक लाभ, भविष्य निर्वाह निधी इत्यादी बाबींसंदर्भातील टपाल, प्रस्ताव व अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयांकडे मोठ्या संख्येने प्रत्यक्ष (भौतिक) स्वरूपात प्राप्त होत असतात. असे संपूर्ण टपाल स्कॅन करून ई-ऑफिस प्रणालीमध्ये नोंदविण्यासाठी विभागीय कार्यालयांमध्ये काही कालावधी आणि मनुष्यबळ लागते. परिणामी, मनुष्यबळावर कामाचा अतिरिक्त ताण येणे, प्राप्त टपालाच्या जतनासाठी अतिरिक्त जागेची उपलब्धता करावी लागणे, अशा अडचणी निर्माण होत आहेत.

राज्यातील काही अशासकीय अनुदानित महाविद्यालये ग्रामीण, दुर्गम व डोंगराळ भागात कार्यरत आहेत. अशा महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना महाविद्यालयाशी संबंधित कामकाजाचा पत्रव्यवहार शासकीय कार्यालयांशी करण्याकरिता अनेकदा दूरचा प्रवास करावा लागतो आणि त्यामुळे कालापव्यय होण्याची शक्यता असते.

या पार्श्वभूमीवर, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८.०४.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना ई-ऑफिस प्रणाली उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील सर्व १२३१ अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांसाठी, प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना लॉग-इन आयडी उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रणालीच्या प्रभावी वापरासाठी आवश्यक प्रशिक्षण/मार्गदर्शनही देण्यात आले आहे. अशा प्रकारे सर्व १२३१ महाविद्यालयांसाठी ई-ऑफिस प्रणाली नियमित वापरासाठी सज्ज आहे.

सदर प्रणालीच्या वापरामुळे शासकीय पत्रे, आदेश, सूचना, ई-रिसीट (e-Receipt) व इतर कागदपत्रे थेट महाविद्यालयांपर्यंत पाठविणे, त्यांचे डिजिटल जतन करणे आणि पत्रव्यवहाराच्या स्थितीचा मागोवा घेणे शक्य होणार आहे. परिणामी, अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि विभागीय सहसंचालक कार्यालये यांच्यामधील प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक, उत्तरदायी व किफायतशीर होऊन कागद, मुद्रण, टपाल व प्रवासावरील खर्चात बचत होईल. तसेच शासनाच्या डिजिटल प्रशासन (Digital Governance) उपक्रमास बळकटी मिळेल.

या अनुषंगाने उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण तसेच संबंधित अन्य शासकीय

कार्यालयांशी पत्रव्यवहारासाठी ई-ऑफीस प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन देणे आणि त्याबाबत सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

१. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या ई-ऑफिस (e-Office) व्यवस्थेचा वापर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालनालय व विभागीय सहसंचालक कार्यालयांशी होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी, ई-ऑफिस प्रणालीचा नियमित व अनिवार्य वापर करावा.

३. केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्ये - मूळ दस्तऐवज/ कागदपत्रे किंवा प्रमाणित प्रत भौतिक स्वरूपात सादर करणे आवश्यक असल्यास ते भौतिक स्वरुपात स्वीकारण्यात यावेत. तथापि, संबंधित दस्तऐवजाची स्कॅन प्रत ही ई-ऑफीस प्रणालीद्वारे देखील सादर केलेली असेल, याची दक्षता घ्यावी.

४. संबंधित अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हे सदर महाविद्यालयाच्या ई-ऑफिस प्रणालीच्या वापराचे प्रशासक (Administrator) असतील. सदर प्रणालीचा लॉग इन आयडी व पासवर्ड यांची गोपनीयता राखणे आणि प्रणालीचा नियमित वापर सुनिश्चित करणे ही जबाबदारी संबंधित प्राचार्यांची असेल.

५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय यांनी सदर अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्य व संबंधित कार्यालय कर्मचाऱ्यांना ई-ऑफीस प्रणालीच्या प्रभावी वापरासाठी आवश्यक प्रशिक्षण, मार्गदर्शन व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी.

६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी त्यांच्या स्तरावरून सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण व संबंधित महाविद्यालयांना आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात आणि त्यानुसार कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६१००६१२२२१६७६०८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B101086728 87A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.10.06 12:23:00 +05'30'

(अशोक मांडे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
३. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये (संबंधित विभागीय सहसंचालक यांच्यामार्फत).

प्रत,

१. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. सह सचिव/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवड नस्ती (मशि-६)